IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# संत एकनाथ -लोकसाहित्यिक व लोकशिक्षक

**सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार**

**M. A. B.Ed (मराठी विभाग)**

**एम. एम. जगताप महाविद्यालय, महाड-रायगड**

**सारांश**

संत एकनाथ हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक थोर संत होते.

संत एकनाथ त्यांच्या पदे, भारुडे, अभंग, गौळणी या साधनांकडे लोकशिक्षणाचे व लोकोद्धाराचे महाद्वार या दृष्टीने पाहत असत. नाथांनी या साधनांचा फार प्रभावी रीतीने वापर केला, व लोकशिक्षणाचे व लोकोद्धाराचे महनीय कार्य केले.

**प्रस्तावना....**

संत एकनाथांनी भारुडे ,पदे अभंग, गौळणी आधी परंपरेने चालत आलेल्या लोक वाङमय प्रकारांची निर्मितीही नाथांनी विपुल प्रमाणात केली आहे. विपुलता व गुणवत्ता या वाङमय निर्मितीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. या वाङमय निर्मितीचे प्रयोजन लोकजागृती व बोध शिक्षण असल्याचेही स्पष्ट दिसते

नाथांच्या त्या वेळच्या परिस्थितीचा काळाचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा लौकिक व वाङमयीन चरित्राचाही थोडक्यात विचार करणे प्रस्तुत ठरते. नाथांनी मराठी भाषेची अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही फार मोठी सेवा केली. मराठी भाषेचा अभिमान त्यांनी ज्ञानेश्वरांप्रमाणेच प्रकट केलाआहे. संस्कृताभिमायांना ठणकावून सांगताना संस्कृत वाणी देवी केली- मग प्राकृत काय चोरांपासून झाली असे उद्गार काढले. ते चिंतनीय व अनुकरणीय असल्याने या दृष्टीने नाथांनी मराठी भाषेत केलेली ग्रंथ निर्मिती पाहणे आवश्यक्य ठरते. विशिष्ट हेतू समोर ठेवून जाणीवपूर्वक संख्येच्या अंगाने विपुल व गुणवत्तेच्या अंगाने अव्वल दर्जाची कामगिरी नाथांनी केली.

**संत एकनाथांचा जीवनपट....**

संत एकनाथांचा जन्म इ.स १५३३ मध्ये झाला. त्यांच्या घराण्यामध्ये विठ्ठल भक्तीची परंपरा होती. महाराष्ट्राची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण येथे त्यांचा जन्म व बालपण व्यतीत झाले. वयाच्या बाराव्या वर्षी गुरु जनार्दन स्वामी यांच्या सेवेला सुरुवात केली. अठराव्या वर्षी त्यांना साक्षात्कार झाला. त्यानंतर गुरु बरोबर तीर्थयात्रा केली व.याच्या २५ व्या वर्षापासून पैठण येथे गृहस्थाश्रमाला सुरुवात केली. पंढरीची नैमित्तक



ISSN 2581-9429 IJARSCT

प्रतिवार्षिक वारी चालूच होती. फाल्गुन वद्य षष्ठी शके १५२१ इ.स.१५९९  ला भावार्थ रामायण अपुरे सोडून नाथ निजधामास गेले.

**एकनाथ कालीन महाराष्ट्र.....**

सोळाव्या शतकामध्ये महाराष्ट्रातील वैभव आणि संपत्ती यांचा लोप झाला होता. समाजामध्ये दुःख, दारिद्र्य, अज्ञान वाढले होते. मराठी भाषा महाराष्ट्र संस्कृती यांच्यावर मुस्लिम आक्रमण झाले होते. देवळे उध्वस्त करणे ,मंदिरांचे मशिदीमध्ये रुपांतर करणे अशा प्रकारांना सुरुवात झाली होती. समाजव्यवस्थेमध्ये विषमता अज्ञान वाढीस लागले होते. ब्राह्मण आणि वेदशास्त्री यांचे अधपतन झाले होते. ढोंगीपणा वाढला होता .धर्म आणि अध्यात्म हा ग्रंथ ब्राह्मणांचा पोटापाण्याचा व्यवसाय झाला होता .पैठण हे कर्मठपणाचे माहेरघर बनले होते. बहुजन समाजाला व शूद्राना संस्कृत विद्या जाणून घेण्याचा अधिकार नव्हता. समाजामध्ये नवस बळी देणे त्याचप्रमाणे शूद्रदेवतांची पूजा यांचे स्तोम माजले होते. माणसे वारंवार देव बदलत होती मध्य मांस सेवन करणे. त्याचप्रमाणे मुस्लिम पोशाख पद्धतीचे अनुकरण करणे .पिराची भक्ती करणे इत्यादी प्रकार वाढले होते. समाजाला वारकरी संप्रदायाचा विसर पडला होता. ज्ञानेश्वरी मध्ये अनेकांनी आपल्या स्वतःच्या ओव्या म्हणजेच अपपाठ मिसळले होते. एकनाथांनी समाजातील अज्ञानी ढोंगी लोकांचे जवळून निरीक्षण केले व त्यांचे चित्र साहित्यामध्ये रेखाटले. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाला उजाळा दिला. भक्ती माळ विशद केला. समाज संघटित केला.

**संत एकनाथांची ग्रंथसंपदा...**

एकनाथांनी ज्ञानेश्वरानंतर ३०० वर्षांनी वारकरी संप्रदायाचे कार्य पुढे नेले. त्यांनी मराठी भाषेतून ग्रंथरचना केली .एकनाथांनी पंडित आणि विद्वानांसाठी चतुश्लोकी भागवत व एकनाथी भागवत हे दोन ग्रंथ लिहिले. मध्यमवर्गीयांसाठी रुक्मिणी स्वयंवर आणि भावार्थरामायण हे दोन ग्रंथ लिहिले .आणि समाजातील सर्वसामान्य माणसांसाठी भारुडाची निर्मिती केली वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान उच्च वर्गापासून कनिष्ठ वर्गांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी लोकभाषेमधून लोकांचे मनोरंजन करत असताना उपदेश केला. लोकशिक्षण देणारे एकनाथ हे पहिले संत कवी. याशिवाय अभंग गौळणी रचल्या. ज्ञानेश्वरांचे समाधी स्थान नामशेष झाले होते इ.स. 1584  एकनाथांनी त्यांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. एकनाथांनी प्रपंच आणि परमार्थ काव्य आणि तत्वज्ञान संस्कृत आणि प्राकृत भाषा पंडित विद्वान आणि जनसामान्य असा दोन टोकांचा समन्वय साधला.

**चतुश्लोकी भागवत**

तीर्थयात्रा करत असताना पंचवटी येथे गुरु जनार्दन स्वामी यांच्या आज्ञेने एकनाथांनी चतुश्लोकी भागवत हा ग्रंथ लिहिला. भागवताच्या दुसऱ्या स्कंधातील काही श्लोकांवर केलेले भाष्य या ग्रंथामध्ये आले आहे . या ग्रंथामधून सर्वानभूती परमेश्वर आहे असा उपदेश एकनाथांनी केला आहे एकनाथांचा हा पहिलाच ग्रंथ असल्यामुळे एकनाथ अतिशय नम्रपणे श्रोत्यांशी बोलतात. ग्रंथ लेखनाचे सारे श्रेय त्यांचे गुरु जनार्दन स्वामी यांना दिले आहे. मराठी भाषेबद्दलचा अभिमान या ग्रंथामध्ये आला आहे.

**एकनाथी भागवत...**

चतुश्लोकी भागवताच्या लेखनानंतर जनार्दन स्वामींना समाधान झाले. त्यानंतर एकनाथांना ११ व्या स्कंधावर भाष्य लिहिण्याची आज्ञा केली. इसवी सन १५७० ते ७९ अशा तीन वर्षांपर्यंत या ग्रंथाचे लेखन चालूच होते .ग्रंथ लिहिण्यास सुरुवात पैठण येथे झाली तर शेवट काशी येथे झाला. या ग्रंथामध्ये एकनाथांनी भागवत धर्माचे तत्त्वज्ञान मराठीतून आणले त्यामुळे सुरुवातीला या ग्रंथाला खूप विरोध झाला. त्यानंतर ग्रंथाची साधी, सोपी भाषा व रचना लोकांना आवडली या ग्रंथाची ओवी संख्या १२८०० आहे .ज्ञानेश्वर येथील तत्त्वज्ञानाच्या आधारे भागवत धर्मासंबंधी विवेचन या ग्रंथामध्ये केले आहे गुरुभक्ती ,गुरुविषयी वाटणारा आदर भक्तीचे महत्त्व ज्ञानावर आधारित भक्ती हे विषय या ग्रंथामध्ये आले आहेत.

**रुक्मिणी स्वयंवर....**

एकनाथांचे हे पहिलेच आख्यान काव्य आहे .वेदांताचे सार बहुजन समाजाला सांगायचे होते म्हणून त्यांनी भागवताच्या दहाव्या स्कंधातील काही श्लोकांवर आधारित रुक्मिणी स्वयंवर हे आख्यान काव्य लिहिले .हे आख्यान काव्य लोकप्रिय झाले .पहिल्या सात अध्यायांमध्ये रुक्मिणी हरणाचा प्रसंग आणि पुढील सहा अध्यायामध्ये युद्ध वर्णन आणि शेवटच्या पाच अध्यायांमध्ये विवाह समारंभाचे वर्णन अशी कथेची विभागणी आहे. ग्रंथाची भाषा साधी असून ग्रंथाला अध्यात्माची बैठक आणि लोक जीवनाचे चित्रण यांची जोड लाभली आहे त्यामुळे हे अख्यान काव्य वेगळे ठरते .ही कृष्ण कथा आहे म्हणून भाविक रमतो जीव- शिव ऐक्य असल्यामुळे ज्ञानी रमतो आणि सुंदर विवाहर्णनामुळे रसिक रमतो.

**भावार्थ रामायण....**

एकनाथांच्या अखेरच्या काळात हा ग्रंथ लिहिला गेला असल्यामुळे या ग्रंथाची पाच कांडे एकनाथांनी लिहिले आहेत तर त्या पुढील भाग एकनाथांच्या मृत्यूनंतर त्यांचा शिष्य गावबा यांनी लिहून पूर्ण केला .ग्रंथांची ओवी संख्या ४५०००आहे. प्रत्यक्ष रामच ग्रंथ लेखनाची प्रेरणा देत आहे असे एकनाथ म्हणतात .त्यांनी रामकथेतून अध्यात्म सांगितले या ग्रंथांमध्ये एकनाथांनी रूपक रचना केली आहे . कौशल्या म्हणजे सदविद्या, कैकयी म्हणजे अविद्या ,विश्वमित्र म्हणजे विवेक आणि वशिष्ठ म्हणजे विचार अशी रचना त्यांनी केली आहे. राम आणि सीता यांच्या एक रूपते मधून एकनाथांनी अद्वैत भक्तीचा आदर्श मांडला आहे. या ग्रंथाद्वारे त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले आहे.

**गौळणी रचना....**

एकनाथांनी पदे आणिगौळणी लिहिल्या.कृष्णाची वर्णन करणारी पदे त्यातील बालभाव, सहजता या गुणांमुळे लोकप्रिय झाली त्यांची वारी याने कुंडल हाले डोळे मोडीत राधा चाले ही पद रचना प्रसिद्ध आहे.

**एकनाथी भारुडे....**

बहुजनांना समजेल ,रुचेल अशी भारुडरचना एकनाथांनी केली. समाजामध्ये बहुरूढ असणाऱ्या भारुडांची रचना एकनाथांनी केली .या भारुडांमध्ये बहुजनांच्या रोजच्या जीवनातील, संसारातील, व्यवहारातील दाखले घेऊन त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले .तत्कालीन समाजात नेहमी आढळणारी भेटणारी ज्योतिषी, कोल्हाटी ,डोंबारी ,गारुडी दरवेशी,महारी, जागत्या इत्यादी माणसांवर एकनाथांनी भारुडे रचली. ही माणसे खेड्यातील लोकांना परिचयाची होती. मरीआई सटवाई या देवताही चांगल्या माहीत होत्या. खेड्यातील बहुजन समाजातील लोकांचे आचार विचार व्यवसाय, भाषा यांचा आधार घेऊन एकनाथांनी भारुडी रचली आहेत. ही भारुडे म्हणजे एकनाथ कालीन लोक जीवनाचे आणि लोकसाहित्याचे प्रकट दर्शन होय. एकनाथांच्या भारुडातील जोशी श्रीरामाला शरण जाण्याचा उपदेश करतो दार उघड बया आता दार उघड या भारुडात जगदंबेला आवाहन केले आहे. तसेच जोहार मायबाप जहार मी विठू पाटलाचा महार या भारुडामधून एकनाथांच्या काळातील वर्णव्यवस्था स्पष्ट होते.नाथांची भारुड रचना विविध प्रकारची आहे. त्यातून लोकांच्या भाषेत लोकजीवनातील उदाहरणे देऊन एकनाथांनी अध्यात्म सांगितले आहे. मनोरंजना मधून अध्यात्म शिकवणारे एकनाथ हे पहिले मराठी संत. भारुडांमधून लोकसाहित्यकार व लोकशिक्षक एकनाथ आपल्याला दिसतात.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

**निष्कर्ष...**

१५३३ ते १५९९ नाथांचा मध्ये त्यांनी समाधी घेतली .नाथांचे चरित्र, चारित्र्य ,ग्रंथकर्तुत्व लोकशिक्षण व लोकोद्धार या सर्वांचा विचार करता हे काम प्रचंड तर आहेत ,पण आश्चर्य वाटण्याजोगे अद्‌भुत प्रकारचे आहे. एकनाथांनी पंडित, विद्वान तसेच सर्वसामान्य माणसाला, बहुजन समाजाला त्यांच्या कुबतीनुसार त्यांच्यात भाषेतून अध्यात्म सोपे करून सांगितले. मुस्लिम आक्रमणाच्या काळामध्ये समाजाला मानवता, भूतदया भक्ती इत्यादी मूल्यांचे मार्गदर्शन केले .आणि महाराष्ट्राला एकसंध ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. म्हणूनच त्यांची कामगिरी समन्वय साधणारी होती असेच म्हटले जाते.

**संदर्भ ग्रंथ**

[1].श्री एकनाथ- वाङ:मयआणि कार्य न.र.फाटक
[2].संत वाङ्:मयाची सामाजिक फलश्रुती -ग .बा.सरदार.
[3].प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, प्रा. ह. श्री शेणोलकर सहावी आवृत्ती ,मोघे प्रकाशन पुणे.
[4].मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास प्रा. प्राची, प्राची प्रकाशन ,मुंबई.